# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

**(ISO 9001:2008 प्रमाणित)**

पत्र पेटी क्र -५१६ औरंगाबाद - ४३१ ००५

(०२४०)२३३४२१६(P) २३३४७६९(O) Fax-२३५६८२०

http://www.dteau.org Email- roaurangabad.dte@gmail.com

**तात्काळ/महत्वाचे**

जाक्र/विकाऔ/शिक्षण/२०१७/३५६८

दिनांक :- 26 SEP 2017

प्रति,

**प्राचार्य,**

शासकीय/अनुदानित व विनाअनुदानित,

पदविका/पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या संस्था

**औरंगाबाद विभाग**

**विषय :- शैक्षणिक वर्ष २०१७-१८ करिता महाराष्ट्र शासनाच्या नव्याने सुरू करण्यात आलेल्या महाडीबीटी पोर्टलवर या विभागातील सर्व संस्थांना लॉगिन आयडी व पासवर्ड देण्याबाबत..**

संदर्भ :- मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय,म.रा.मुंबई यांचे पत्र क्र.१८/तशिसं/महाडीबीटी पोर्टल/२०१७/१५७ दिनांक २१/०९/२०१७

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये आपणास कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०१७-१८ पासून मा.संचालक (आयटी), माहिती व तंत्रज्ञान संचालनालय, मंत्रालय, मुंबई द्वारे नव्यान सुरू करण्यात आलेल्या राज्यस्तरीय महाडीबीटी पोर्टल/MahaDBT Portal द्वारे तंत्रशिक्षण संचालनालय,म.रा.मुंबई यांचेमार्फत खालील योजना राबविण्यात येणार आहेत.

१. राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क प्रतिपुर्ती योजना
२. डॉ.पंजाबराव देशमुख वसतीगृह निर्वाह भत्ता योजना
३. उच्च व्यावसायिक व इयत्ता बारावीनंतर सर्व अभ्यासक्रमांमध्ये शिक्षण घेण्या-या राज्यातील अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांकरिता शिष्यवृत्ती योजना [शासन निर्णय-भाग- १ (वैद्यकीय अभ्यासक्रम वगळून)]

उपरोक्त तिन्ही शिष्यवृत्ती योजनांसाठी ऑनलाईन अर्ज महाराष्ट्र शासनाचे संकेतस्थळ www.mahadbt.gov.in द्वारे भरून घेण्याकरिता तरतूद महाराष्ट्र शासनाने उपलब्ध करून दिलेली आहे.

या पत्रान्वये आपणास कळविण्यात येते की, सदरील योजनेसाठीचे आपल्या महाविद्यालयास महाडीबीटी पोर्टलचे दोन लॉगिन आयडी व पासवर्ड एक संस्थेसाठी व एक संस्थांच्या क्लार्क साठी मा.संचालक (आयटी), माहिती व तंत्रज्ञान संचालनालय यांचेकडून या कार्यालयास प्राप्त झालेले आहे. आपल्या संस्थेचा ई-मेल आयडी या कार्यालया तर्फे ई-मेल द्वारे तात्काळ त्या शिष्यवृत्ती योजने बाबतचा आयडी व पासवर्ड आपल्या ई-मेल वरती या कार्यालयाकडून पाठविण्यात येईल याची नोंद घ्यावी.

ते युजर आयडी व पासवर्ड या कर्यालयातून संस्थेस देण्यासाठी प्राचार्यांनी त्यांचे नाव, भ्रमणध्वनी क्रमांक त्यांचा स्वतःचा ई-मेल आयडी पत्रात नमुद करून ते पत्र संस्थेच्या डी.टी.ई.कोडसह roaurangabad@dtemaharashtra.gov.in या ई-मेलवर त्वरीत पाठवावा-जेणे करून आपल्या संस्थेचा ई-मेल आयडी व पासवर्ड या कार्यालयातर्फे ई-मेल द्वारे पत्रात नमूद केलेल्या ई-मेल वर पाठविण्यात येतील संस्थेने ते लॉगिन आयडी व पासवर्ड मिळाल्यानंतर ताबडतोब बदलावा युजर आयडी व पासवर्ड सांभाळून ठेवण्याची संपूर्ण जबाबदारी संस्था प्रमुखांची व संबंधीत कर्मचा-यांची राहील तो युजर आयडी पासवर्ड वापरून अर्जांची छाननी नियमाप्रमाणे करावी.

(महेश शिवणकर)

प्र.सहसंचालक,

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

प्रत :- मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय,म.रा.मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.

EBC UC